# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २४ जुलै, २०१५ / श्रावण २, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वित्त आणि नियोजन, वने मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

### खिरसाना सावनेर (जि.अमरावती) मार्गावरील दोन नाल्यांचे पाणी पावसाळ्यात रस्त्यावर येत असल्याबाबत

**(१) * १७००५ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर पंचायत समितीच्या (जि. अमरावती) हद्दीतील खिरसाना सावनेर मार्गावरील दोन नाल्यांचे पाणी पावसाळ्यात रस्त्यावर येत असल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाता येत नाही, यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होते, याकरीता या दोन नाल्यावर पुलाच्या बांधकामाची संबंधिताकडे ग्रामस्थांनी वारंवार मागणी करण्यात येऊनही पुलाऐवजी रपट्याचे कच्चे काम करण्यात येऊन यात गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नाल्यावर पूल बांधण्याबाबत तसेच रपट्याचे कच्चे काम करणा-या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) विषयांकीत रपट्याचे काम जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, अमरावती यांचेमार्फत मानकाप्रमाणे करण्यात आले असून रपट्याचा पृष्ठभाग सुस्थितीत आहे.

प्रश्नांकित रस्ता जिल्हा परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत झाला आहे.

विषयांकीत रपट्याच्या ठिकाणी दोन लहान पूलांची आवश्यकता असून, सदर काम मंजूरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यास कुकडी धरणातील पाणी मिळण्याबाबत**

**(२) * १८८६५ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यात पाणी प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असल्याने कुकडी धरणातील पाणी मिळण्याबाबत तेथील शेतकऱ्यांनी माहे मे २०१५ वा त्यासुमारास पाच ते सहा वेळा आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी प्रश्नावर तेथील जनतेने आंदोलन करुनही शासनाने कोणतीच उपाययोजना केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील जनतेला पाणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) कुकडी प्रकल्प हा आठमाही प्रकल्प असून उन्हाळी हंगामात सिंचनासाठी पाणी देण्याची तरतूद नाही.

उन्हाळी हंगाम २०१५ साठी दि.१०/०४/२०१५ रोजी मा.राज्यमंत्री जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली व या प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील सर्व लोकप्रतिनिधी समवेत बैठक झाली या बैठकीत उपलब्ध पाण्याचा आढावा घेण्यात आला व पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तन देण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार दि.२०/४/२०१५ ते २९/५/२०१५ या दरम्यान आवर्तन देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पागरे बुद्रुक चिंचवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील धरणासाठी जमीन संपादीत केलेल्या शेतक-यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(३) * १८३८८ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पागरे बुद्रुक चिंचवाडी येथील धरणाचे काम चार वर्षापूर्वी पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणासाठी जमीन गेलेल्या शेतक-यांना एसआर ९३ नुसार जमिनीचा मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोबदला मिळावा म्हणून ग्रामस्थ सन २०१४ पासून सातत्याने पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धरणग्रस्तांना मोबदला देण्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(५) चार वर्ष मोबदल्यापासून धरणग्रस्त शेतकरी वंचित राहण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिका-यांची चौकशी होवून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) अशंत: खरे आहे.

धरणासाठी संपादन केलेल्या सर्व जमीनीचा मोबदला शेतकऱ्यांना वाटप केलेला आहे. एसआर ९३ हा पर्यायी रस्त्यासाठीचा प्रस्ताव असून जलसंपदा विभागाने अंतिम निवाड्यापोटी आवश्यक रु.१६.५० लक्ष निधी उपविभागीय अधिकारी, राजापूर (महसूल) यांचेकडे जमा केलेला आहे.

(३) व (४) अशंत: खरे आहे.

भुसंपादन प्रक्रिया पूर्ण न झाल्याने मोबदल्याचे वाटप करण्यात आलेले नाही. प्रकरणे व्यपगत झालेले आहे.

(५) विलंबास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे स्तरावर सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर वन विभागातील उत्तर उमरेड वनपरिक्षेत्रातील सागवान झाडांची केलेली अवैध वृक्षतोड

**(४) * २४००८ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर वन विभागातील उत्तर उमरेड वनपरिक्षेत्रातील वनक्षेत्र अधिकारी व सहाय्यक उपवन संरक्षक, नागपूर वन विभाग यांच्या संगनमताने कुही, आपतूर-उमरेड राज्यमार्ग क्र.२६१ वरील शासकीय हद्दीतील सागवान झाडांची मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पोलीस महासंचालक मुंबई यांना दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी तर मा.मुख्यमंत्री व वनमंत्री, प्रधान मुख्यवन संरक्षक यांना दिनाक १७ जानेवारी, २०१५ रोजी निवेदनपत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

कुही आपतूर-उमरेड या राज्य मार्ग लगतचे मौजा गावसुत, शेत सर्व्हे क्र. २०३ श्री.श्रीवण विठोबा माकडे यांच्या शेतातील सागवान झाडे वनपरिक्षेत्र अधिकारी तथा वृक्ष अधिकारी, उत्तर उमरेड यांचे आदेश दि. ०८.०५.२०१४ अन्वये तोडण्यात आली असून प्रश्नातील भाग १ मध्ये नमूद शासकीय हद्दीमध्ये सागवान झाडांची अवैध वृक्षतोड झाल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील दैठणा खुर्द येथील विहिरींच्या कामात झालेली अनियमितता

**(५) * २६५८९ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील तीर्थपूरी येथून जवळच असलेल्या दैठणा खुर्द येथे सन २०१२ - २०१४ या काळात एकूण ११ विहिरी मनरेगाच्या माध्यमातून मंजूर झाल्यापैकी केवळ दोन लाभार्थ्यांनी विहिरी खोदल्या परंतु बाकी ९ लाभार्थ्यांनी विहिर न खोदताच संबंधित अधिका-यांच्या संगनमताने परस्पर देयके घेतल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

घनसावंगी तालुक्यातील दैठणा खुर्द ग्रामपंचायत अंतर्गत सन २०११-१२ मध्ये महात्मा गांधी नरेगा अंतर्गत ११ सिंचन विहिरी व सन २०१४-१५ मध्ये १५ सिंचन विहिरी अशा एकूण २६ सिंचन विहिरींना मंजूरी देण्यात आलेली आहे. सन २०११-१२ मधील ११ विहिरींची कामे सुरु करण्यात आली असून २ सिंचन विहिरी पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित ९ विहिरीसंदर्भात अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

(२) या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. सन २०११-१२ मधील मंजूर ११ विहिरींपैकी २ विहिरी पूर्ण झाल्या असून, उर्वरित ९ विहिरींपैकी १ विहिर ही ज्या लाभार्थ्यांस मंजूर करण्यात आली त्याच्या शेतात न खोदता अन्य व्यक्तीच्या शेतात खोदण्यात आलेली आहे. उर्वरित ८ अपूर्ण सिंचन विहिरींचे मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले मोजमाप व प्रत्यक्षात असलेले मोजमाप यात तफावत आढळून आली आहे. प्रत्यक्ष झालेल्या खर्चाप्रमाणे विहिरीचे काम झाले नसल्याचे चौकशीमध्ये आढळून आले आहे.

(३) या प्रकारे अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित कृषि अधिकारी व ग्रामसेविका यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांचेविरुध्द व तत्कालीन गट विकास अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानोरा (जि.वाशिम) येथील पंचायत समितीमध्ये शतकोटी वृक्ष लागवड योजनेत झालेला गैरव्यवहार

**(६) * २६५४७ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानोरा (जि.वाशिम) येथील पंचायत समिती अंतर्गत येणा-या बहुतांश ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत शतकोटी वृक्ष लागवड योजना कार्यान्वित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब-याच ठिकाणी ही योजना पूर्ण न करता केवळ कागदोपत्री उद्दीष्टपूर्ण दाखवून लाखो रुपयाचा निधीचा गैरव्यवहार केला असल्याची बाब दिनांक ६ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने योजना पूर्ण न करता केवळ कागदोपत्री उद्दीष्टपूर्ण दाखवून लाखो रुपयाचा निधीचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) पंचायत समिती, मानोरा अंतर्गत सन २०१४-१५ मध्ये शतकोटी वृक्ष लागवड अंतर्गत ४००० झाडे लावण्यात आली आहेत. त्यापैकी जिवंत झाडांची टक्केवारी ६८.७५% आहे. पंचायत समिती कार्यालयामार्फत होत असलेल्या नियमित चौकशीमध्ये सन २०१४-१५ मधील शतकोटी वृक्ष लागवड योजनेअंतर्गत कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार आढळून आला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयातील नद्यांमधील गाळ काढण्याबाबत**

**(७) * १९६०२ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी तालुक्यातील गौतमी आणि संगमेश्वर तालुक्यातील शास्त्री व गड नद्यांमधील गाळ काढण्याच्या दृष्टीने दिनांक ८ जुलै, २०१३ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संबंधित अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी, रत्नागिरी, कार्यकारी अभियंता पाटबंधारे अलोरे, चिपळूण आदीच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीमध्ये रत्नागिरी तालुक्यातील चांदेराई, टेंबे, काझरघाटी, गौतमी येथील तसेच संगमेश्वर तालुक्यातील गडनदी पात्रातील आरवली, माखजन, कासे भागातील त्याचप्रमाणे शास्त्रीनदीतील कसबा, नावडी, पुर्नवसन भागातील गाळ काढण्याबाबत निर्णय होऊन आज दीड वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापी गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येत्या पावसाळ्यात तालुक्याला पुराचा धोका सहन करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

तत्कालीन मा.राज्यमंत्री ना.उदयजी सामंत, नगर विकास तथा पालक मत्री, जिल्हा रत्नागिरी यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरी जिल्हयातील नदयांमधील गाळ काढण्यासंदर्भात दिनांक ८.७.२०१३ रोजी एम आय डी सी समिती कक्ष, बांद्रा, मुंबई येथे बैठक संपन्न झाली होती.

(२) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी त्यांचे पत्र क्र.नियोजन/रत्ना/कार्या २/जिवायो/प्रशासकीय मंजूरी/२०१४ दिनांक १५/८१८ दि. ३१.३.२०१५ अन्वये वशिष्ठी नदीतील मौजे पोफळी (पोफळी चिपळूण आणी शिवनदी चिपळूण) येथील गाळ काढणेच्या रु. ४,९९,६१२/- रकमेच्या तसेच मौजे शिरगाव सोनारगाव येथील कॉजवेच्या वरच्या बाजूला गाळ काढणेच्या रु.५,००,७३३/- रक्कमेच्या कामास व मौजे पाचल येथील अर्जुना नदीतील गाळ काढणेच्या रु. ४,९८,५६३/- रक्कमेच्या तसेच

जंगलदेव ते स्मशानशेड गाळ काढणेच्या रु. ५,०६,६२८/- रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार यांत्रिकी विभागामार्फत गाळ काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत सन २०१४-१५ मध्ये वशिष्ठी नदीतील १९.२७ सघमी व मौजे पाचल येथील अर्जुना नदीतील ३८.३० सघमी इतका गाळ काढण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**फुलंब्री तालुक्यात रोजगार हमी योजनेतून मजूरांना काम उपलब्ध करून देण्याबाबत**

**(८) * २५१६४ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री तालुक्यात रोजगार हमी योजनेची विविध १३२ कामे सुरु आहेत, या कामांवर ११ हजार मजूर काम करीत आहेत, यात विहिर, रस्ते, मातीनाला बंधाऱ्यांची कामे सुरु असून तालुक्यात ११ हजार मजूरांना काम मिळाले असले तरी १२ हजार मजूरांनी कामे मिळावीत म्हणून मागणी केल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या १२ हजार मजूरांना रोजगार हमी योजनेतून काम उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

फुलंब्री तालुक्यात दिनांक ३०/०४/२०१५ ते ०३/०६/२०१५ या कालावधीत एकूण ११,८६२ मजूरांनी काम मागणी केली असून एकूण ९३० कामावर ११,८६२ मजूरांना कामे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. या व्यतिरिक्त १२ हजार मजुरांची मागणी प्रलंबित नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यात सन २०१४-१५ मध्ये जलयुक्त शिवार अंतर्गत केलेल्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(९) * २४५८५ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शेतकरी आत्महत्या पुर्णतः थांबविण्यासाठी विविध उपाययोजना करुन जलयुक्त शिवार अंतर्गत मौजे घाटंजी (जि.यवतमाळ) मध्ये सन २०१४-१५ मध्ये जलयुक्त शिवार अंतर्गत मणी, सगदा, पांढुर्णा किन्ही, शिरोली, कार्ली यासह अनेक गावांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या कामांना मंजुरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील जलयुक्त शिवारांतर्गत मंजुर कामेही नियमबाह्य पध्दतीने केली जात असून या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामातील अनेक ठिकाणी ढाळीचे बांध, सिमेंट नाला बांध, गाळ काढणे, लुज बोल्डर, डिप सी सी टी, विहीर पुर्नभरण तुटफुट दुरुस्तीचे कामात तसेच ढाळीचे कामात सुपिक माती ओढून ढिगारे व सिमेंट प्लग बंधा-यांच्या कामात साहित्य निकृष्ट दर्जाचे वापरुन काम करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, घाटंजी तालुक्यातील या नियमबाह्य कामामुळे व संबंधीत कृषी अधिका-यांच्या दुर्लक्षीत धोरणामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय व जलयुक्त शिवार योजनेचे मुळ लक्ष दुर्लक्षीत झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने जलयुक्त शिवारांतर्गत नियमबाह्य पध्दतीने काम करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत तालुका घाटंजी (जि.यवतमाळ) मध्ये सन २०१४-१५ मध्ये मणीर, सगदा, पांढुर्णा किन्ही, शिरोली, कार्ली यासह एकुण २१ गावामध्ये रु. ३५.५९ कोटीच्या कामांचा आराखडा तयार करुन त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) व (३) नाही.

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत घेण्यात येत असलेली कामे जलसंधारण कामाच्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे करण्यात येत आहेत.

तालुका स्तरीय समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी (प्रांत), सदस्य तथा तहसिलदार घांटजी, तसेच विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यवतमाळ, उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, यांनी विविध कामाना वेळोवेळी भेटी दिलेल्या आहेत.

(४) नाही.

(५) सदर कामाची जिल्हाधिकारी यांनी स्थापन केलेल्या पथकामार्फत तपासणी केली असून कामे निकषाप्रमाणे तांत्रिक दृष्ट्या योग्य असल्याचे आढळून आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील किनवट येथे मंजूर झालेला उच्च पातळी बंधारा मौजे मंगरुळ (ता.हदगांव) येथे हलविण्यात आल्याबाबत

**(१०) * २६१०९ श्री.नागेश आष्टीकर-पाटील (हदगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट उच्च पातळी बंधारा मौ.मंगरुळ जि.नांदेड विशेष कृती कार्यक्रमांतर्गत दर सूचीप्रमाणे १० टक्के जास्त दर आकारणी करून शासनाची दिशाभूल करणाऱ्या सर्व संबंधित उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.४ व गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांची सर्व संबंधित अधिकारी व शारदा कन्स्ट्रक्शन यांच्या संगनमताने बांधलेल्या उच्च पातळी बंधाऱ्यांची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मे, २०१५ रोजीच्या सुमारास कार्यकारी संचालक, औरंगाबाद पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांच्याकडे लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किनवट उच्च पातळी बंधारा हा किनवट येथे मंजूर झालेला असतांना तो मौजे मंगरुळ (ता.हदगांव) येथे हलविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या बंधाऱ्यांची जागा हलवितांना जुन्याच निविदा व जुनेच अंदाजपत्रक ठेवण्यात येऊन १४ टक्के जास्तीचा निधी बळकावला, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचबरोबर मंगरुळ हे गाव आदिवासी क्षेत्रात मोडत नसतांनाही आदिवासी क्षेत्राकरीता राखीव असलेले १० टक्क्यांचे अनुदानही घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) मंगरूळ येथील वरील बाजुला कोटा (ता.हिमायतनगर) येथे पहिला बंधारा असल्याने सदरचा बंधारा या बंधाऱ्यात बुडून गेला तसेच ३ कि.मी. अंतरावर सहस्त्रकुंड विद्युत प्रकल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या बंधाऱ्यासंदर्भातील वरील वस्तुस्थितीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) हो, सदर बांधा-याचे मूळ स्थळ पैनगंगा वन्यजीव अभयारण्याच्या अधिसूचित क्षेत्रात येत होते. वनजमीन अधिग्रहणाकरीता लागणारा प्रदीर्घ कालावधी विचारात घेऊन तसेच बंधारा स्थळ अभयारण्याच्या हद्दीबाहेर घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेऊन बंधा-याचे स्थळ मंगरुळ येथे हलविण्यात आले.

(३) किनवट येथील बंधारा कामाचे कार्यारंभ आदेश दि.१२/०४/२०१० रोजी देण्यात आले. सदर बंधा-यामुळे अभयारण्याचे काही क्षेत्र बाधित होत असल्याने वनविभागाने आक्षेप घेतले. त्यामुळे साधारणत: दीड वर्ष कालावधीत काम बंद होते. किनवट बंधाऱ्यासाठी निश्चित केलेल्या करारा अंतर्गतच मंगरुळ स्थळी सक्षम स्तरावर मान्यता घेवून बंधा-याचे काम करण्यात आले.

मूळ करार हा २००८-०९ चे अंदाजपत्रकीय किंमतीवर १४.९० टक्के अधिक्याचा होता. या स्पर्धात्मक निविदा अधिक्यास सक्षम स्तरावर मान्यता देण्यात आली होती.

मंजूर निविदेवर स्थळ बदलाच्या कारणास्तव कोणतीही अतिरिक्त रक्कम देण्यात आली नाही.

(४) सदर बंधारा आदिवासी उपयोजनेअंतर्गत नसल्याने आदिवासी स्त्रोत्रातून तरतूद उपलब्ध झाली नाही.

(५) मंगरुळ येथील उच्च पातळी बंधा-याच्या वरील बाजूस कोटा येथे बंधारा अस्तित्वात नाही. तसेच मंगरुळ उच्च पातळी बंधा-याच्या वरील बाजूस १६ कि.मी. अंतरावर बंधा-याच्या बुडीत क्षेत्राबाहेर मौ.कोठा ता.हिमायतनगर येथे नियोजित सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्प आहे.

(६) सुमारे २ कोटी रुपयांची बचत विचारात घेऊन तसेच वन जमीन संपादन टाळण्याच्यादृष्टीने सदर बंधारा स्थळ बदल सक्षम स्तरावर मान्यता घेऊन झालेला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे माणिकपुंज (ता.नांदगाव,जि.नाशिक) येथील धरणाचे नियोजित आराखड्याप्रमाणे पाटचा-यांचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(११) * २६२८६ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माणिकपुंज (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील धरणाचे नियोजित आराखड्याप्रमाणे पाटचा-यांचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जानेवारी, २०१५ रोजी एका पत्राद्वारे मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) माणिकपुंज प्रकल्पाच्या नियोजित आराखड्या प्रमाणे, मुख्य कालव्याची लांबी २१ कि.मी. असून, त्यापैकी १५ कि.मी. पर्यंत कामे पूर्ण झालेली आहेत. कि.मी. १६ ते २१ मधील कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, एकूण २४ वितरिका आहेत. त्यापैकी १३ वितरीकांची कामे पूर्ण झाली असून, वितरीका क्रमांक १ ते १३ द्वारे नियमित सिंचन करण्यात येत आहे. वितरीका क्र. १४ व १८ ची कामे प्रगतीत असून उर्वरित वितरिकांची कामे हाती घेण्याच्या अनुषंगाने सर्वेक्षण अंदाजपत्रके संरेखा मान्यतेचे प्रस्ताव तयार करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

-----------------

**नागपूर येथील शुअरटेक हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी चार वर्षीय मुलीवर उपचार नाकारल्याबाबत**

**(१२) * १७२९४ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शुअरटेक हॉस्पिटलमध्ये दहा हजार रुपये आधी जमा न केल्यामुळे एका चार वर्षीय मुलीवर उपचार करण्यास नकार दिला व रात्री साडेतीन वाजता आजारी मुलीसह तिच्या आईवडीलांना रुग्णालयाबाहेर काढले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त प्रकरणी सदरील रुग्णालयाच्या प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**कृष्णा खोरे अंतर्गत असलेली राज्यस्तरीय कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे उच्चस्तरीय बंधा-यामध्ये रुपांतरीत करण्याबाबत**

**(१३) * २६१३८ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.अर्जून खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृष्णा खोरे अंतर्गत असलेली राज्यस्तरीय कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे उच्चस्तरीय बंधा-यामध्ये (बॅरेज) रुपांतरीत करण्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनीधी यांनी मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) सद्य:स्थिती नवीन प्रकल्प हाती न घेण्याचे मा.राज्यपाल महोदयांचे निर्देश आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील आरफळ योजनेचे पाणी शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(१४) * १७९७१ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील आरफळ योजनेचे पाणी शेतकऱ्यांना देण्यात यावे तसेच म्हैसाळ आणि पुणदी-विसापूर योजना सुरू करण्यात याव्यात यासाठी दिनांक २ मे, २०१५ रोजी तासगाव बंद करुन नागरिकांनी आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रश्नी मागण्यांचे स्वरुप काय आहे व दुष्काळग्रस्त नागरिकांच्या मागण्यांवर निर्णय घेऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

याबाबत महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी शेतकरी संघटना व अन्य यांचे दिनांक ०५.०५.२०१५ रोजीचे पत्र क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झाले होते.

(२) सांगली जिल्ह्यातील तासगांव तालुक्यातील विसापूर व पुणदी उपसा सिंचन योजना, आरफळ योजना व म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचे पाणी १० मे पूर्वी तातडीने सोडण्यात यावे अन्यथा ११ मे रोजी तासगांव पाटबंधारे कार्यालयासमोर धरणे, १५ मे रोजी तासगांव येथे रस्ता रोको व त्यानंतर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा वजा निवेदन श्री.महेश यशवंत खराडे प्रवक्ते महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी शेतकरी संघटना व अन्य यांनी दि.५/५/२०१५ रोजीचे पत्रान्वये क्षेत्रीय कार्यालयास देण्यात आले होते.

म्हैसाळ योजनेमधून उन्हाळी हंगामात दि.०७/०४/२०१५ ते ०६/०६/२०१५ या कालावधीत एक आवर्तन दिले आहे. यामध्ये तासगांव तालुक्यातील काही क्षेत्रीय सिंचनाचा लाभ मिळाला आहे.

दि.२०/५/२०१५ ते १७/०६/२०१५ पर्यंत टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत विसापूर व पुणदी उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील लघु पाटबंधारे तलाव, को.प.बंधारे, सिमेंट बंधारे, पाझर तलाव इ. मध्ये पाणी सोडण्यात आले आहे.

कालवा सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे सन २०१४-१५ मधील उन्हाळी हंगामाकरीता आरफळ कालव्यामध्ये सांगली जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील सिंचन करणेसाठी आवर्तनाद्वारे दि. ०१/०५/२०१५ ते ३१/०५/२०१५ पर्यंत पाणी सोडण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**ग्रामपंचायत कोरपना (जि.चंद्रपूर) येथील मागासक्षेत्र विकासनिधी योजनेतील गैरव्यवहाराबाबत**

**(१५) * २६४१३ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंद्रपूर) येथील मागासक्षेत्र विकासनिधी योजनेत ४ लाख ६९ हजार रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्या चौकशी अहवालात गुन्हा नोंदवुन कारवाई करण्याचे नमुद केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गैरव्यवहारातील दोंषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) सदरील प्रकरणात दोषी असलेले ग्राम विकास अधिकारी, कोरपना (जि.चंद्रपूर) यांना दिनांक २६.६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आलेले आहे. तसेच सरपंच, ग्रामपंचायत कोरपना यांचेवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ३९(१) अन्वये कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील जिल्हा रुग्णालयासह उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये व आरोग्य केंद्रातील पद भरतीत झालेला गैरव्यवहार

**(१६) * २०८३७ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा रुग्णालयासह उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, आणि आरोग्य केंद्रात अकाऊंटंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर (एडीइओ) ही पदे भरण्यासाठी शासनाने ईगल सिक्युरिटी ॲन्ड सर्व्हिसेस प्रा.लि.मुंबई या कंपनीस कंत्राट दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरात एकूण २२९८ पदे भरण्यासाठी वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीनुसार नागपूर येथे आयोजित केलेल्या मुलाखतीद्वारे ही पदे भरण्यात आली असून संबंधित कंपनीच्या नागपूर, चंद्रपूर व भद्रावती येथे नेमलेल्या दलालांनी शिफारस केलेल्याच उमेदवारांच्या मुलाखती घेवून उमेदवारांकडून ५० हजार ते दीड लाखापर्यंत रक्कम वसूल करुन त्यांना नियुक्ती पत्रके दिली गेली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध शासकीय रुग्णालयामध्ये काम करुनही या कर्मचा-यांना तब्बल वर्षभरापासून एक रुपयाचेही वेतन मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आर्थिक फसवणूक झालेल्या या कर्मचा-यांनी थकीत वेतन मिळण्यासाठी मा.आरोग्यमंत्री व आरोग्य उपसंचालक यांना दिलेल्या निवेदनावर अद्याप कोणतीही कार्यवाही न होता फक्त आश्वासन दिले गेले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुषगांने सदर कर्मचा-यांचे थकीत वेतन देणेबाबत व आर्थिक फसवणूक करणाऱ्या संबंधित दोषी कंपनी व त्यांचे दलालांविरुध्द कोणती करवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत २२९८ अकाऊंटंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर पुरविण्यासाठी ईगल सिक्युरिटी ॲन्ड सर्व्हिसेस प्रा.लि. या कंपनीस दि.०६.०२.२०१४ रोजी कार्यादेश (कंत्राट) देण्यात आले होते.

(२) अंशत: खरे आहे.

ईगल सिक्युरिटी ॲन्ड सर्व्हिसेस प्रा.लि. या कंपनीशी केलेल्या करारानुसार जाहिरात देऊन पात्र उमेदवारांची नियुक्ती करणे ही सदर कंपनीची जबाबदारी असून नियुक्ती प्रक्रियेमध्ये शासनाने हस्तक्षेप केलेला नाही. नियुक्तीसाठी उमेदवारांकडून रक्कम घेतल्याच्या प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत भरती प्रक्रियेमध्ये उमेदवाराकडून कुठल्याही प्रकारचे पैसे घेण्यात येवू नयेत, तशी तक्रार प्राप्त झाल्यास सुरक्षा ठेव जप्त करण्यात येऊन कंपनीस काळ्या यादीत टाकण्यात येईल असे कंपनीस बजावण्यात आले होते.

(३), (४) व (५) कंपनीने मे, २०१४ पासून कर्मचा-यांचे वेतन अदा केलेले नाही. सदर कंपनीने शासनासोबत केलेल्या करारातील अटी व शर्तीनुसार सदर कर्मचा-यांचे वेतन देणे कंपनीस बंधनकारक आहे. कंपनीने करारातील अटी व शर्तीचा भंग केल्याने कंपनीला दंड आकारण्यात आला असून कंपनीच्या देयकापेक्षा दंडाची रक्कम जास्त आहे. यास्तव कंपनीचे देयक अदा करण्यात आले नाही. २०१५ च्या पहिल्या अधिवेशनादरम्यान कर्मचा-यांना थेटपणे वेतन अदा करण्याची बाब तपासण्यात आली. तथापि दंडाची रक्कम देयकापेक्षा जास्त असल्याने कर्मचा-यांना थेटपणे वेतन अदा करणे अशक्य झाले. दरम्यान अखिल भारतीय एडीईओ संघटना यांनी कंपनीविरुध्द केलेल्या तक्रारीबाबत कामगार उपायुक्तांनी मुख्य मालक या नात्याने शासनाने वेतन तात्काळ अदा करावे, असे आदेश दि.२४.०२.२०१५ रोजी दिले. तथापि कंपनीसोबत झालेल्या करारानुसार कर्मचा-याचे वेतन देणे कंपनीला बंधनकारक असल्याची शासनाची भूमिका असून कंपनीकडील दंडाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महिला व बाल विकास विभागाने विविध साहित्य खरेदीमध्ये केलेला गैरव्यवहार**

**(१७) * १६६६३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला व बाल विकास विभागांर्तगत पहिल्या दिवशी रेटकॉन्ट्रॅक्ट केले दुस-या दिवशी ठेकेदाराने आयुक्तांना प्रस्ताव सादर केला आणि तिस-या दिवशी महिला व बाल विकास विभागाने १ कोटी ८० लाख रुपयांच्या प्लास्टिकच्या चटई खरेदी करण्यास मान्यता दिली अशा प्रकारे महिला व बाल विकास विभागाने २०६ कोटी ५० लाख रुपयांची विविध साहित्यांची खरेदी करुन शासकीय पैशांचा अपव्यय केल्याची माहिती दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने आर्थिक व्यवहारामधून साहित्य खरेदीच्या नस्ती नियमबाह्य व बेकायदेशीरपणे अति जलद गतीने फिरुन मार्केट दरापेक्षाही दुप्पट दराने साहित्याची खरेदी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काळ्या यादीमध्ये टाकलेल्या कंत्राटदाराकडून साहित्याची खरेदी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने काळया यादीत टाकलेल्या कंत्राटदाराकडून मार्केट दरापेक्षाही जास्त दराने साहित्याची खरेदी करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत यंत्रणांनी विहित केलेल्या दरकरारानुसार विविध साहित्याची खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयात गौणखनिज निधीचा झालेला गैरव्यवहार**

**(१८) * २५९६५ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात गौणखनिज यावर शासनाकडून ९५ कोटी रुपयांचा निधी मिळाला, मात्र ग्रामपंचायत, ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांच्या संगनमताने गौणखनिज निधीचा मोठया प्रमाणावर गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे एप्रिल-मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हयास तहसिलदार यांचेकडून पंचायत समित्यामार्फत ग्रामपंचायतींना गौण खनिज अंतर्गत रु. ७६,२६,०८,५२२/- इतका निधी प्राप्त झाला आहे. सदर निधीबाबत संजय पाटील, जि.प.सदस्य यांचा दिनांक ७/५/२०१५ रोजीचा तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(२) व (३) दिनांक ७/५/२०१५ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी सुरु आहे. याबाबतचा चौकशी अहवाल प्राप्त होताच, त्यामध्ये काही गैरव्यवहार आढळल्यास संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करण्यात येईल, असे मु.का.अ. सोलापूर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्हयामध्ये जलयुक्त शिवाराअंतर्गत गाव निवडीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१९) * २४४०१ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये जलयुक्त शिवार योजनेत पाण्याची तीव्र आवश्यकता असणारी गावे कोरडीच असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याची तीव्र आवश्यकता असणाऱ्या गावांची निवड सदर योजनेत झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलयुक्त शिवाराअंतर्गत गाव निवडीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानामध्ये कोल्हापुर जिल्हयास सन २०१५-१६ मध्ये विभागीय आयुक्त पुणे यांच्या मार्फत ६९ गावे निवड करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. सदर गावे दि.२ फेब्रुवारी, २०१५ च्या शासन पत्रानुसार ठरविण्यात आलेल्या गाव निवडीच्या निकषानुसार निवडण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निंभोर, (ता.धरणगांव, जि.जळगांव) खामखेडा येथील बिबट्याच्या हल्ल्यात शाळकरी विद्यार्थ्याचा झालेला मृत्यु

**(२०) * १९९७५ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निंभोर, (ता.धरणगांव, जि.जळगांव) खामखेडा येथे बकऱ्या चारण्यासाठी गेलेल्या शाळकरी विद्यार्थ्यावर बिबट्याने हल्ला करुन त्याला ठार केल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिबट्याने केलेल्या या हल्ल्यामुळे परिसरात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) दिनांक १८.०५.२०१५ रोजी निभोरा (ता.धरणगाव, जि.यवतमाळ) खामखेडा येथे बकऱ्या चारण्यासाठी गेलेल्या १५ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला हे खरे आहे तथापि सदरचा मृत्यू बिबट्याच्या हल्ल्यात झाल्याबाबत वन विभागास अद्यापपावेतो पुरावे मिळून आलेले नाहीत.

तथापि ह्या भागात बिबट्याचा वावर असल्याने वन अधिकारी/कर्मचारी यांनी घटना स्थळी भेट देऊन स्थानिक गावकऱ्यांना वन्यप्राण्यापासून संरक्षणासाठी काय काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच सतत ५ दिवस रात्रदिवस गस्त घातली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील जायकवाडीच्या डाव्या कालव्यावरील मुरमाचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(२१) * २६१०० श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील जायकवाडीच्या डाव्या कालव्यावरील अवैध मुरुम उत्खनन प्रकरणात महसूल विभागाने जायकवाडी विभागाच्या अधिका-यांना दोषी ठरवत सव्वा कोटी रुपयांची आर्थिक जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याचे आदेश देऊनही माहे जून, २०१५ पर्यंत या प्रकरणी कोणतीच कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) औरंगाबाद जिल्ह्यातील जायकवाडी प्रकल्प डाव्या कालव्याबाबत हे खरे नाही.

तथापि परभणी जिल्ह्यातील जायकवाडी प्रकल्प डाव्या कालव्यावरील कि.मी. १४७ येथील परवाना देऊन उचलेल्या मुरुमासाठी स्वामित्व शुल्क महसुल विभागाकडे जमा केलेले आहे. उर्वरित मुरुम हा शासकीय कामासाठी वापरलेला आहे व त्याचे स्वामित्व शुल्क कंत्राटदाराच्या देयकामधुन वसुल झालेले आहे.

याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांचेशी विभागीय स्तरावर पत्रव्यवहार चालु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उर्ध्व गोदावरी प्रकल्पासह २९० प्रगतीतील कामांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(२२) * २३१८० श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या उर्ध्व गोदावरी प्रकल्पासह २९० प्रगतीतील कामांचे प्रस्ताव सुधारीत प्रशासकीय मान्यतेवाचून रखडल्यामुळे या कामांच्या अंदाजपत्रकामध्ये दिवसेंदिवस वाढ होवूनही कामे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच विदर्भ सिंचन महामंडळाकडे तब्बल दोन हजार कोटीहून अधिक निधी मंजूर असूनही सिंचन प्रकल्पांच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेअभावी हा निधी पडून असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलसंपदा विभाग व संबंधित महामंडळाकडे निधी शिल्लक असतांनाही प्रशासकीय मान्यता विहीत मुदतीत न दिल्यामुळे या प्रकल्पांची कामे सुरु झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कामांना तातडीने सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

उर्ध्व गोदावरी प्रकल्पासह २६५ प्रकल्पांचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव मे, २०१५ मध्ये शासनाच्या विचाराधीन होते.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

जून, २०१५ अखरे विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे २३०४ कोटी निधी अखर्चित आहे. मात्र सुधरित प्रशासकीय मान्यता हे या मागचे एकमेव कारण नसून भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन हस्तांतरण ही सुध्दा यामागची कारणे आहेत.

सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी प्रकल्पाच्या कामावर परिणाम होऊ नये याकरिता २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षातील वितरीत निधीच्या मर्यादेत प्रमा/ सुप्रमा किंमतीपेक्षा वाढीव खर्च करण्यास काही प्रकल्पास मान्यता दिलेली आहे.

(४) २८ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता जून/जुलै, २०१५ मध्ये प्रदान करण्यात आली आहे. उर्वरित प्रकल्पाचे सुप्रमा प्रस्ताव शासन/महामंडळ स्तरावर छाननीत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया शहरामध्ये ए.एन.एम. व जी.एन.एम नर्सिंग स्कूलमध्ये पदांची निर्मिती व पदभरती करण्याबाबत

**(२३) * २६२९१ श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया शहरामध्ये ए.एन.एम. व जी.एन.एम नर्सिंग स्कुल उभारण्याकरिता राज्य शासनाच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयानुसार मंजूरी प्रदान करण्यात आली तसेच भारतीय व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांनीही मान्यता प्रदान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नर्सिंग स्कूलची स्थापना करण्याबाबत केंद्र शासनाकडून अनुदानातील पहिला हप्ता रु. ७ कोटी इतकी रक्कम राज्य शासनास प्राप्त झाली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नर्सिंग स्कूलचे संचालन व व्यवस्थापन करण्याकरिता आवश्यक पदांची अद्यापही निर्मिती व पदभरती केली नसल्याने जिल्ह्यातील दुर्बल महिलांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू नर्सिंग स्कूलमधील आवश्यक पदांची निर्मिती व पदभरती करण्यासंदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

तथापि, गोंदिया येथे ए.एन.एम. व जी.एन.एम. नर्सिंग स्कूलसाठी अनुक्रमे दि.१ ऑक्टोबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये आणि दि.१७ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

(२) सदर जी.एन.एम. नर्सिंग स्कूलसाठी केंद्र शासनाकडून रु. ७ कोटी ९५ लक्ष इतके अनुदान मंजूर झाले आहे. त्यापैकी पहिला हप्ता रु.३,३७,८५,५००/- इतका निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाला आहे.

(३) हे खरे नाही.

रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्याचे काम नर्सिंग स्कूलमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून केले जात नसून, इतर प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व परिचारिकांद्वारे करण्यात येते. गोंदिया जिल्ह्यात दुर्बल महिलांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागल्याचे एकही प्रकरण शासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

(४) व (५) सदर नर्सिंग स्कूलच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव वित्त विभागास फेरसादर करण्यात आला आहे. सदर पदनिर्मिती झाल्यानंतर पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

----------------

**धर्माबाद (ता.जि.नांदेड) येथील बालविकास प्रकल्प कार्यालयात अनेक गैरप्रकार होत असल्याबाबत**

**(२४) * १६९४७ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (ता.जि.नांदेड) येथील बालविकास प्रकल्प कार्यालयात अनेक गैरप्रकार होत असून बालविकास मंत्रालयाच्या ग्रामीण भागासाठी आलेल्या योजना केवळ कागदावरच दाखवून प्रभारी प्रकल्प अधिकारी यांच्या संगनमताने अनेक अनुदाने घेतल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किशोरी मुलींची कार्यशाळा, धर्माबाद तालुक्यातील करखेली, जारीकोटी, मंगनाळी या तीन सर्कलमधील ठराविक गावांत घेण्यात यावे असा शासनाचा निकष आहे या योजना राबवणा-या तीन सुपरवायझरकडून फक्त रुटीनप्रमाणे गावांना भेट देऊन कार्यशाळा फक्त कागदावरच दाखवून अनुदान हडप करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व तदनुषंगाने संबंधित योजना कागदोपत्रे दाखवुन अनुदान हडप करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पंढरपूर, देहू, आळंदी, पालखी मार्ग व तळ यांच्या विकास आराखडयास मंजूरी देण्याबाबत**

**(२५) * २०३१६ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर, देहू, आळंदी, पालखी मार्ग व तळ यांच्या विकासासाठी ११० कोटीच्या सुधारित आराखडयाच्या मंजुरीबाबत शासनाने दिनांक ११ मे, २०१५ रोजी परिपत्रक काढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास आराखडयाची अंमलबजावणीसाठी विभागीय महसूल आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २०१५-१६ मध्ये वरील तिर्थक्षेत्र विकास आराखडयांसाठी किती रक्कम मंजूर करण्यात आली आहे,

(४) असल्यास, आतापर्यंत त्यापैकी कोणती कामे सुरु झाली आहेत व त्यासाठी किती रक्कम खर्च करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे.

नियोजन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १२/९/२०१४ अन्वये श्री.क्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, नेवासा, पालखीतळ / मार्ग आराखड्याच्या रु.१०९४.८९ कोटी शासन सहभागाच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक ११ मे, २०१५ रोजी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात श्री. क्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, नेवासा, पालखीतळ / मार्ग आराखड्यासाठी अर्थसंकल्पित केलेल्या निधीमधून रु.१८.२० लक्ष निधी विभागीय आयुक्त, पुणे यांना वेतनासाठी वितरित केला आहे.

(२) होय.

(३) रु.५०.०० कोटी.

(४) श्री.क्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, नेवासा, पालखीतळ / मार्ग आराखड्याची अंमलबजावणी व संनियंत्रण विभागीय आयुक्त, पुणे यांच्यामार्फत करण्यात येते. या आराखड्यात मंजूर करण्यात आलेल्या कामांपैकी एकूण ३३ कामे पूर्ण झालेली असून ४० कामे सुरु आहेत याकामांवर आतापर्यंत विभागीय आयुक्त, पुणे यांच्यामार्फत रु.१९४.६२ कोटी खर्च झाला आहे. आराखड्यांतर्गत सुरु करण्यात आलेल्या कामांमध्ये अंतर्गत रस्ते, पूल, पाणीपुरवठा, मलनि:सारण, स्वच्छतागृहे, परिसर विकास, बाह्यवळण रस्ते इत्यादि कामांचा समावेश आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बांधकाम पुर्ण झालेल्या धरणांपैकी १६१ धरणे उच्च भूकंप प्रवण क्षेत्रामध्ये असल्याबाबत

**(२६) * १६५७२ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बांधकाम पुर्ण झालेल्या धरणांपैकी १६१ धरणे उच्च भूकंप प्रवण क्षेत्रात म्हणजेच झोन चार मध्ये असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा उच्च भुकंपप्रवण क्षेत्रातील धरणांच्या सुरक्षततेसाठी तसेच भविष्यातील दुर्घटना रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड IS १८९३-२००२ नुसार महाराष्ट्र राज्य हा भूकंपाच्या तिव्रतेच्या अनुषंगाने झोन २, ३ व ४ अशा तीन झोन मध्ये विभागाला गेला आहे. राज्यात जुन २०१५ अखेर बांधकाम पूर्ण झालेल्या मोठ्या धरणांपैकी (Large Dams) १६२ धरणे उच्च भूकंप प्रवण क्षेत्रात, म्हणजेच झोन चार मध्ये आहेत.

(२) राज्यातील उच्च भुकंपप्रवण क्षेत्रातील धरणांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने सन १९९४ मध्ये देऊस्कर समिती गठीत केली होती. या समितीने काही धरणांच्या बाबतीत मजबुतीकरण करणे किंवा तत्सम उपाययोजना करण्याचे सुचविले होते. या समितीच्या शिफारशीनुसार आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यात जलसंपदा विभागामार्फत वेगवेगळ्या प्रकल्पांजवळ आवश्यकतेनुसार ३५ भूकंप मापक केंद्राची उभारणी करण्यात आलेली आहे.

या १६२ धरणांपैकी कोयना व वारणा या महत्वाच्या धरणांच्या परिसरात १२ भूकंप मापन केंद्राचे जाळे उभारण्यात आलेले आहे. या केंद्रावर प्राप्त झालेल्या माहितीचे पृथ:करण संशोधन अधिकारी, उपकरणे व संशोधन विभाग, नाशिक यांचेकडून करण्यात येते. तसेच ३५ भूकंप मापक केंद्राकडून प्राप्त झालेल्या माहितीचे पृथ: करण करुन तिमाही अहवाल तयार करुन सर्व संबंधितांना पाठविण्यात येतो.

रिश्टर स्केल ४ व त्यापेक्षा जास्त तिव्रतेच्या भूकंपानंतर सदर भूकंप प्रवण क्षेत्रात असणाऱ्या धरणांची विशेष तपासणी संबंधित क्षेत्रिय प्रकल्प अधिकारी करतात व त्यांचे अहवाल संबंधित मुख्य अभियंता व धरण सुरक्षितता संघटनेकडे पाठवतात. भूकंपामुळे धरणात काही त्रुटी उद्‌भवल्यास त्याबाबत तात्काळ कार्यवाही प्रकल्प यंत्रणेकडून करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हयातील श्रीक्षेत्र जेजुरी गड विकास आराखड्याबाबत**

**(२७) * २६३५३ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेजुरी (जि.पुणे) येथील खंडोबा मंदीराच्या गडकोटाचे सज्जा, सभामंडप, मुख्य मंदिर कळसाच्या बाजुने वॉटर प्रुफींग करणे, दसरा पालखी सोहळा प्रदक्षिणा मार्गावर पेव्हर ब्लॉक बसविणे इत्यादी कामासाठी शासनाने १ कोटी ८० लाख रुपयाचा निधी माहे मार्च, २०१५ मध्ये मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सर्व कामे अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामे पुर्ण न करण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच सदरहू कामे लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे.

नियोजन विभागाच्या दि. १० सप्टेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार श्रीक्षेत्र जेजुरी गड विकास आराखड्यांतर्गत रु. १८०.७८ लक्ष किंमतीची कामे देवस्थानाकडून करण्याऐवजी शासन सहभागातून करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय.

(३) श्रीक्षेत्र जेजुरी गड विकास आराखड्यांची अंमलबजावणी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून करण्यात येते. पालखीमार्ग व उत्तर बाजूस दगडी पेव्हिंग करणे या कामांची अंदाजपत्रके सद्यस्थितीत तांत्रिक मंजूरीच्या स्तरावर आहेत. गडकोटाचे सज्जा, सभा मंडप मुख्य मंदिर कळसाच्या बाजूने वॉटर प्रुफींग करणे या कामांच्या जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(४) तांत्रिक मान्यता व निविदा मंजूर झाल्यानंतर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून कामे हाती घेण्यात येतील.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चिखला (ता. अहमदपूर, जि.लातूर) पाझर तलावाचे काम निकृष्ट झाल्याबाबत**

**(२८) * २०२०२ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखला (ता.अहमदपूर, जि.लातूर) पाझर तलावाचे काम अत्यंत निकृष्ट झाले असून या कामाची सखोल चौकशी करण्यात येवून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी तसेच हे गाव जलयुक्त शिवार योजनेत घेण्यात यावे, अशी मागणी चिखला ग्रामस्थांच्या वतीने उपविभागीय अधिकारी, अहमदपूर यांचेकडे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास एका लेखी निवेदनाद्‌वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) याप्रकरणी उप विभागीय अधिकारी, लघु सिंचन (जलसंधारण) उप विभाग, अहमदपूर यांचेकडून चौकशी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वि-हाम (ता.खेड, जि.पुणे) भिमाशंकर परिसरातील घनदाट जंगलात विना परवाना झाडांची वृक्षतोड केल्याबाबत**

**(२९) * २६०५९ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वि-हाम (ता.खेड, जि.पुणे) भिमाशंकर परिसरातील घनदाट जंगलात मुक्तानंद ॲग्रो प्रोसेसिंग प्रा.लि.या कंपनीने विना परवाना झाडांची वृक्षतोड केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक १६ जून, २०१५ रोजीच्या सुमारास मा.पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व तदनुसार संबंधित विना परवाना झाडांची वृक्षतोड करणाऱ्या संबंधित दोषी कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मुक्तानंद ॲग्रो प्रोसेसिंग प्रा.लि. या कंपनीने त्यांचे मालकीचे खाजगी क्षेत्रातून पोहोच रस्ता तयार करताना, एकूण १० वृक्षांची विना-परवाना तोड केल्याचे आढळून आलेले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) चौकशीमध्ये तोड केलेल्या १० झाडांपैकी २ आंब्याचे झाड महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम, १९६४ अंतर्गत अनुसूचित यादीतील असल्याने मुक्तानंद ॲग्रो प्रोसेसिंग प्रा.लि. या कंपनीवर कार्यवाही करुन रु. १०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. अनुसूचित यादीत नसलेल्या इतर ८ झाडांचे वृक्षतोडीबाबत तहसीलदार यांना कळविण्यात आलेले आले. या ८ झाडांच्या वृक्षतोडीबाबत विनापरवाना वाहतुकीचा वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. संशयित आरोपींचे जाबजबाब घेऊन तपास सुरु आहे.

-----------------

## महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात झालेली दिरंगाई

**(३०) * २६७४७ श्री.भिमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई यांनी याचिका क्र.१५३/२०१४ प्रकरणी दिनांक ३ सप्टेंबर, २०१४ रोजी सन २०१३ मध्ये आरोग्य परिसेविका पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत १०२ गुण प्राप्त करणाऱ्या खुल्या प्रवर्गातील केवळ महिला उमेदवारांच्या निवड यादीचे पुर्नरिक्षण करून यादी प्रसिध्द करण्याचे आदेश मा.संचालक, आरोग्य सेवा यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी एकूण ५ आठवड्यांची मुदत देण्यात येऊनही वर्षभराचा कालावधी लोटला, तरी सदर आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याची गंभीर बाब माहे जून, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने सदरहू आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय.
(३) मा.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार १०२ गुण प्राप्त करणाऱ्या "खुला" प्रवर्गातील केवळ महिला उमेदवाराच्या निवड यादीचे पुनर्निरिक्षण करण्यात आले असून त्या यादीमध्ये काही बदल नसल्याचे एम.के.सी.एल. पुणे यांचे कार्यालयाने दिनांक १ जुलै, २०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पालघर जिल्हयातील तलासरी व उधवा तालुक्यात ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण जागेत झालेले अनधिकृत बांधकाम

**(३१) * २५७८९ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील तलासरी व उधवा तालुक्यात ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण जागेत उभ्या राहिलेल्या अनधिकृत व्यवसायिक इमारतीच्या बांधकामाच्या आराखडयाला ग्रामपंचायत व नगररचना विभागाकडून मंजूरी नसताना अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यास विलंब होत असल्याचे दिनांक ११ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर गावठाण जागेत व्यावसायिक इमारत बांधकामास परवानगी देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर बांधकामाच्या आराखडयाला मंजूरी नसल्याने संबंधित अधिकारी, विकासक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) चौकशी सुरु आहे.
(३) तलासरी तालुक्यात तलासरी तसेच उधवा ग्रामपंचायत हद्दीत व्यावसायिक इमारतीच्या बांधकामास तेथील सरपंचांनी परस्पर ना हरकत दाखले दिलेले आहेत.
(४) दोन्ही सरपंचांकडून गट विकास आधिकारी, तलासरी यांनी दिनांक ०२.०७.२०१५ च्या पत्रान्वये खुलास मागविण्यात आला आहे. तसेच अनधिकृत बांधकामाविरुध्द कार्यवाही करण्याबाबत ग्रामपंचायतींना निर्देश दिलेले आहेत.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यातील बालकांच्या कुपोषणाची स्थिती गंभीर असल्याबाबत**

**(३२) * १६४५१ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा),**

**श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: आदिवासी क्षेत्रात ३७ हजार ५०० बालके कुपोषित असून त्यातील ९ हजार ८६७ बालके तीव्र तर २७ हजार ६३३ बालके मध्यम श्रेणीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच एकात्मिक बालविकास योजना, पोषण आहार आदि सुविधा पुरवूनही राज्यातील अंगणवाडयांमधील मुले मोठया प्रमाणात कुपोषित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टीएचआर (टेक होम रेशन) च्या नावाखाली दिल्या जाणाऱ्या पोषण आहारातील गैरव्यवहारामुळेच राज्यातील कुपोषणाची स्थिती गंभीर असल्याचे अंगणवाडी व बालविकासाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार पोषण आहारात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच कुपोषण दूर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत माहे ऑक्टोबर, २०१४ च्या मासिक प्रगती अहवालावरुन राज्यातील १५ जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील अंणवाड्यातील बालकांची श्रेणीनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| एकुण वजन घेतलेली बालेक | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाच्या बालकांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ९०४०७१ | ७२८८३० | १४०६८१ | ३४५६० | ३.८२ |

(२) हे खरे नाही.

राज्यातील कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | वजन घेतलेली एकुण बालके | तीव्र कमी वजनाची बालके | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१०-११ | ६३६७४५८ | २६३७०४ | ४.१४ |
| २०११-१२ | ६१४८४७५ | १४१२०७ | २.३० |
| २०१२-१३ | ६३०९२१७ | ९८३१३ | १.५६ |
| २०१३-१४ | ५७९१९७७ | ८७३७६ | १.५१ |

वरील आकडेवारीवरुन राज्यातील कुपोषणाच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येत आहे.

(३) व (४), हे खरे नाही.

तथापि, कुपोषणाला आळा घालण्याकरिता राज्यात राजमाता जिजाऊ कुपोषण मिशनची स्थापना करण्यात आलेली असून याद्वारे कुपोषणाला आळा घालण्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच VCDC/CTC द्वारे कुपोषित बालकांना आवश्यक सुविधा व उपचार पुरविण्यात येऊन कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत नियमित आहाराव्यतिरिक्त अतिरिक्त पौष्टीक मुल्य असलेली खाद्य पदार्थ, अंडी/केळी तसेच विविध प्रकारची आरोग्यदायी औषधे इ. चा पुरवठा अंगणवाडीतील लाभार्थींना निधीच्या उपलब्धतेनुसार केला जातो. आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषणमुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो. अंगणवाडीतील बालकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरिता आरोग्य विभागाशी योग्य तो समन्वय साधण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील रुग्णालयात उपचार करण्यासाठी व्हॅन्टीलेटर उपलब्ध नसल्याने बालकांचा झालेला मृत्यु

**(३३) * १६८६१ अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात ज्या रुग्णालयांत राजीव गांधी जीवनदायी योजना लागू आहे त्या सर्वच रुग्णालयात लहान बालकावर उपचार करण्यासाठी व्हॅन्टीलेटर उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या रुग्णालयात व्हॅन्टीलेटर उपलब्ध नसल्याने व ज्या रुग्णालयात व्हॅन्टीलेटर यंत्र उपलब्ध आहेत ते नादुरुस्त अवस्थेत असल्याने सन २०१३ ते २०१५ या कालावधीत अमरावती जिल्ह्यात ० ते २२ दिवसाच्या वयोगटातील ८२५ बालकांचा मृत्यू झाला आहे, हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यात बालकांच्या व नवजात बालकांच्या उपचारासाठी ५ रुग्णालयांना मान्यता आहे. त्यापैकी पंजाबराव देशमुख रुग्णालय आणि मातृछाया रुग्णालय येथे प्रत्येकी दोन व्हेंटीलेटर ० ते २२ दिवसांच्या लहान बालकांवर उपचार करण्याकरिता उपलब्ध आहेत. स्त्री रुग्णालयात सुध्दा २ व्हेंटीलेटर उपलब्ध आहेत, परंतू त्यावर ३.५ किलो वजनावरील बालकांवर उपचार होऊ शकतात.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत सन २०१३ ते २०१५ या कालावधीत अमरावती जिल्ह्यात १८९ बालकांवर उपचार करण्यात आले असून त्यापैकी २३ बालकांचा मृत्यू झालेला आहे. सदर मृत्यु व्हेंटीलेटर बंद असल्यामुळे झालेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंदिया वन विभागाअंतर्गत (ता.सडक अर्जुनी) वनपरिक्षेत्रात
सागवान वृक्षांची झालेली अवैध वृक्षतोड**

**(३४) * १८७३३ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया वन विभागाअंतर्गत (ता.सडक, अर्जुनी) वनपरिक्षेत्रांतर्गत डोंगरगांव बीटमधील ब्राम्हणी गट नं. ३४० मध्ये श्रीमती गंगाबाई मसु उईके मंदीटोला हिच्या नावे असलेली शेती ही व्याघ्र प्रकल्पाच्या सीमेला लागून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती गंगाबाई उईके यांचे दिनांक १७ फेब्रुवारी, २०१५ रोजी निधन झाल्यानंतर दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी डोगंरगाव बीटचे प्रभारी गार्ड श्री. गहाणे, वनपरिक्षेत्राधिकारी व गोंदियाचे जिल्हा वनसरंक्षक यांनी ठेकेदाराशी संगनमत करुन कोणाचीही परवानगी न घेता श्रीमती गंगाबाई उईके यांच्या शेतातील सागवान वृक्षांची अवैध तोड केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे व्याघ्र प्रकल्पाला मोठा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) प्रश्नामध्ये नमूद अर्जदाराचे नाव श्रीमती गंगाबाई मसू उईके नसून श्रीमती रंगाबाई मसू उईके आहे. मृत्यू प्रमाणपत्रानुसार श्रीमती रंगाबाई मसू उईके यांचे निधन दिनांक १७ फेब्रुवारी, २०१५ रोजी झाले असून दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ रोजी झालेले आहे. वृक्ष अधिकारी तथा वनपरीक्षेत्र अधिकारी सडक/अर्जूनी यांचे दिनांक २७/०३/२०१५ च्या आदेशानुसार महाराष्ट्र वृक्षतोड (विनियमन) अधिनियम १९६४ अंतर्गत सदर ६४ वृक्षतोडीची परवानगी दिलेली आहे. अर्जदार हे आदिवासी असल्याने सदर गटातील वृक्षतोडीची संपूर्ण कार्यवाही ही वनविभागामार्फतच करण्यात आलेली आहे तोड केलेल्या वृक्षांची विक्री अधिनियम, १९६९ नुसार शासकीय आगारातून करण्यात येणार असून सदरील वृक्षतोडी करताना ठेकेदाराशी संगनमत करण्यात आलेले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथे कोल्हापूर जिल्हा परिषदेने बांधलेल्या तलावाचे गावगुंडांनी नुकसान केल्याबाबत

**(३५) * २३२८० श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील ४३ वर्षापूर्वी कोल्हापूर जिल्हा परिषदेने बांधलेला तलाव काही गावगुंडांनी जमीन बळकावण्याच्या हेतुने फोडल्याची गंभीर बाब माहे मार्च, २०१५ च्या अखेरीस निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकारची चौकशी करुन दोषीवर कडक कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, इचलकरंजी यांनी ग्रामविकास मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा तलाव पुनर्बांधकामाबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

अज्ञात इसमाकडून तलावाचा भराव फोडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन आढळून येत नाही.

तथापि, सदर प्रकरणी अज्ञात व्यक्तिविरुध्द हातकणंगले पोलीस स्टेशनमध्ये दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी उप अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग क्रमांक ६, हातकणंगले यांनी गुन्हा दाखल केला आहे.

(३) जिल्हा परिषद स्वनिधीतून निधी उपलब्धतेनुसार तलावाच्या पुनर्बांधणीच्या कामाचे नियोजन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील भातसा धरणासाठी जमिनी संपादीत केलेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३६) * १९३५२ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील भातसा धरणासाठी ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादीत केल्या त्यांच्या सातबारा उता-यावर प्रकल्पग्रस्त म्हणून नोंद घेऊनसुध्दा अद्याप त्यांचे पुनर्वसन न केल्याने शासनाच्या विरोधात संताप व्यक्त करत शेकडो प्रकल्पग्रस्तांनी माहे मार्च २०१५ मध्ये आझाद मैदानात धरणे आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती भातसा धरण प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या पुनर्वसनाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय.

(२) व (३) भातसा धरण प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नासंबंधी मा.मंत्री (म.व पु.) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१.०१.२०१४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीतील निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी भातसा नगर वसाहतीतील १५-३३ हेक्टर क्षेत्र हस्तांतरणाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांना पाठविला आहे.

नोकरी न मिळालेल्या प्रकल्पग्रस्तांची यादी मुंबई महापालिकेस पाठविण्याचे निर्देश उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) ठाणे यांना उक्त बैठकीत देण्यात आले होते.

सदर निर्देशानुसार उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) ठाणे यांनी दि. ३१.०५.२०१४ रोजी भातसा प्रकल्पग्रस्तांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सादर केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) येथील कलोते धरणातून ॲडलॅब इमॅजिका पार्कमधील वॉटर पार्कसाठी पाणी देण्यात येत असल्याबाबत

**(३७) * २०९६९ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) येथील कलोते धरणातून ॲडलॅब इमॅजिका पार्कमध्ये नव्याने तयार होत असलेल्या वॉटर पार्कसाठी जलवाहिनी टाकून पाणी नेण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खालापूर तालुक्यातील शेतकरी, ग्रामस्थ यांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असतानाही केवळ मौजमजेसाठी ॲडलॅबला पाणी देण्याचे कारण काय आहे,

(३) असल्यास, रोज लाखो लिटर पाण्याचा उपसा कलोते धरणातून होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत खालापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच यांच्यासह सर्व सदस्यांनी ॲडलॅब पार्कला पाणी देण्यास तीव्र हरकत घेवून तहसिलदारांना माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) कलोते धरणापासून ॲडलॅब इमॅजिका पार्ककरिता पाणी आरक्षण मंजूर केले आहे. तथापि अद्याप पाणी वापर सुरु केलेला नाही.

(२) धरणातील उपयुक्त ४.१९ दलघमी पाण्यापैकी सिंचनासाठी व पिण्यासाठी एकूण २.०५१ दलघमी पाणी वापर प्रस्तावित आहे. त्यामुळे राहिलेल्या १.२९९ दलघमी पाणी साठ्यातून ०.४१ दलघमी पाणी ॲडलॅब साठी देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(३) ॲडलॅब कंपनीतर्फे धरणातून रोज १.५० दशलक्ष लीटर प्रतिदिन इतका पाणी उपसा अपेक्षित आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

दि. १६.०१.२०१५ रोजी खालापूर ग्रामस्थ व शेतकरी यांनी तहसीलदार, खालापूर यांना यासंबंधीचे निवेदन सादर केले आहे.

(५) धरणातील पाणी साठ्यातून सिंचन व स्थानिक ग्रामस्थांना पिण्यासाठी लागणारे आवश्यक तेवढे पाणी शिल्लक ठेवून उर्वरीत पाणीसाठ्यातून ॲडलॅब साठी शासनाने पाणी मंजूरी दिलेली असल्याने निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## नांदेड जिल्ह्यातील मागासक्षेत्र अनुदान निधी (बीआरजीएफ) योजनेअंतर्गत ग्रामपंचायती मार्फत गावात जलशुध्दीकरण यंत्र बसविण्याबाबत

**(३८) * १७१३२ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील मागासक्षेत्र अनुदान निधी (बीआरजीएफ) योजनेअंतर्गत ग्रामपंचायती मार्फत गावात जलशुध्दीकरण यंत्र बसविण्याचा व कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावानुसार जिल्हा परिषद प्रशासनाने अद्यापही गावात जलशुध्दीकरण यंत्र बसविण्याचे काम हाती घेतले नसल्याने ही योजना दिनांक ३१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास बंद होत असल्यामुळे अनेक महिन्यापासून पडून असलेला सुमारे ८ कोटी रुपयांचा निधी परत शासनाकडे वर्ग केला जाणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निधी अखर्चित राहिल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळले व त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच उक्त योजना कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

नांदेड जिल्ह्यामध्ये जल शुध्दीकरण संयत्रा संदर्भात प्रशासकीय मान्यता दिलेल्या ४१० ग्रामपंचायतींना सन २०१४-१५ या वर्षात पहिला हप्ता रु.४.१८ कोटी इतका वर्ग करण्यात आलेला आहे. सदर योजनेचा निधी खर्च करण्याचे नियोजन सुरु आहे. मागास क्षेत्र अनुदान निधी (बीआरजीएफ) ही योजना १००% केंद्र पुरस्कत योजना असून सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासून योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होणार नाही. त्यामुळे सदरची योजना बंद करण्याचे ठरविण्यात आले आहे.

(२) कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही. योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील मजूरांनी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतील काम देण्याची मागणी करुनही त्यांना रोजगार न दिल्याबाबत

**(३९) * २७०२६ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील येथील मजूरांनी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतील कायद्यानुसार काम देण्याची मागणी करुनही संबंधित शासकीय विभाग एजन्सीनी त्यांना रोजगार न दिल्याबाबत तेथील मजूरांना ४०,३२० रूपये बेकारी भत्ता द्यावा लागल्याचे माहे मे-जून २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतील तरतूदीनुसार तालुक्यातील बेरोजगार मजूरांना १०० दिवसांच्या रोजगाराची हमी दिलेली असतानाही मजूरांना रोजगार उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

विक्रमगड तालुक्यामध्ये सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजूरांच्या मागणीनुसार १,४५,०४९ इतके मनुष्यदिन रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच मजूरांना तात्काळ काम उपलब्ध करुन देण्यासाठी या तालुक्यामध्ये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये वृक्ष लागवडीची ४३ कामे, रस्त्याची १८ कामे व बंधाऱ्यातील गाळ काढण्याची ७ कामे अशी एकूण ६८ कामे शेल्फवर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

(३), (४) व (५) ग्रामपंचायत इंदगाव (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथे मजूरांनी कामाची मागणी केल्यानंतर काम उपलब्ध करुन देण्यास विहित कालावधीपेक्षा १४ दिवस विलंब झाल्यामुळे संबंधीत मजूरांना रु. ४०,३२०/- इतका बेरोजगार भत्ता प्रदान करण्यात आला आहे. तसेच या विलंबास जबाबदार असलेल्या ग्रामसेविका, ग्रामपंचायत इंदगाव यांचेकडून बेरोजगार भत्त्याची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच त्यांची इतरत्र बदली करण्यात आली असून त्यांना निलंबीत करुन त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, पालघर यांना कळविण्यात आले आहे. तसेच या विलंबाबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती व तहसिलदार विक्रमगड यांचा खुलासा मागविण्यात आला आहे.

-----------------

**मौजे सायगांव (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथे पाणलोट योजनेंतर्गत शेततळयांची कामे कागदोपत्री दाखवून केलेला गैरव्यवहार**

**(४०) * १६६४८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सायगांव (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथे पाणलोट योजनेंतर्गत १७ लाख ५० हजार रुपये आणि मौजा कन्हाळगाव (रामपूर रिठ) येथे ३६ लाख ५० हजार रुपयांची कामे तसेच कोकडकसा व देऊळगाव परिसरात २ करोड २५ लक्ष रुपये खर्चाचे २२५ शेत तळयांची कामे तत्कालीन तालुका कृषी अधिकारी, धानोरा यांनी कंत्राटदारांच्या नावे कागदोपत्री दाखवून सदर कामे स्वतःच करुन करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याची माहिती दिनांक ३० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०० च्यावर शेततळ्यांची कामे झालेली नसतांना सुध्दा सदर कामे पुर्ण झाली असल्याचे बनावट कागदपत्रे तयार करुन त्यामाध्यमातून करोडो रुपयांच्या देयकांची उचल केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गैरप्रकाराची तक्रार लोकप्रतिनिधींनी कृषी मंत्री, जलसंधारण राज्यमंत्री, प्रधान सचिव कृषी मंत्रालय, मुंबई यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५, माहे मार्च, २०१५ आणि माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी गेलेल्या काही अधिका-यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी न जाता व सर्व कामाची चौकशी न करता गैरप्रकार करणा-या अधिका-यांना सोबत घेवून गडचिरोली येथे बंदद्वार कोणताही गैरप्रकार झालेला नाही असा चौकशी अहवाल तयार करुन शासनाकडे दोन महिन्यापुर्वी पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, सदरची कामे कागदोपत्री दाखवून गैरव्यवहार केल्याची तक्रार जानेवारी, २०१५ मध्ये शासनास प्राप्त झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

मा.राज्यमंत्री जलसंधारण यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये लोकप्रतिनिधीकडून तक्रार करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

तथापि जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, गडचिरोली यांनी दोन चमू गठीत करुन चौकशी केली आहे. तसेच दक्षता पथक,कृषि आयुक्तालय, पुणे - यांनी सदर प्रकरणी चौकशी करुन अहवाल शासनास सादर केला आहे.

(५) चौकशी करण्यात आलेली असून लेखाविषयक त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

संबंधित दोषीवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यात पाझर तलाव आणि बंधाऱ्याच्या कामात जास्तीचे मोजमाप दाखवून केलेला गैरव्यवहार

**(४१) * २६१०६ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात पाझर तलाव आणि बंधाऱ्याच्या कामात जास्तीचे मोजमाप दाखवून १० लाख ४ हजार ७५ रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी तत्कालीन कार्यकारी अभियंता, शाखा अभियंता आणि मजूर सहकारी सोसायटीच्या अध्यक्षाला अटक केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व तदनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) मा.लोक आयुक्त यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्यात येवून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांच्यामार्फत करण्यात येत असून, संबंधित कार्यकारी अभियंता सेवानिवृत्त झाले आहेत व शाखा अभियंता यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माटुंगा (मुंबई) डेव्हिड ससून रिमांड होममधील बाल कैद्याचा झालेला मृत्यु**

**(४२) * १६५९० श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माटुंगा येथील डेव्हिड ससून रिमांड होममधील १७ वर्षाच्या आमीर खान नामक बाल कैद्याचा मृत्यू रिमांड होम मधील सहका-यांच्या छळामुळे झाला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुलाच्या मृत्यूपूर्व जवाबामध्ये त्याने दोन सहका-यांनी व रिमांड होम मधील अधिक्षक यांनी छळ केल्याचा तसेच अनैतिक कृत्य केल्याचा जवाब दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

दि.१८.५.२०१५ रोजी सदर प्रवेशित संस्थेतून पळून जात असताना इतर प्रवेशितांनी त्यास पकडून मारहाण केली असल्याचे निष्पन्न झालेले आहे. मात्र बाल न्याय मंडळ यांचेकडून जामिन मंजूर झाल्यामुळे दि.२०.५.२०१५ रोजी त्याला पालकांच्या ताब्यात देण्यात आले. सदर प्रवेशित संस्थेत दि. २०.०५.२०१५ पर्यंत संस्थेत होता. त्या कालावधीत त्याने मारहाण झाली असल्याची तक्रार केलेली नाही.

पालकांच्या ताब्यात दि. २०.५.२०१५ रोजी दिल्यानंतर त्याला त्याच्या पालकांनी दि.२३.०५.२०१५ रोजी नायर हॉस्पिटलमध्ये दाखल केले. वैद्यकीय उपचार दरम्यान दि.२८.५.२०१५ रोजी त्याचा मृत्यू झालेला आहे. सदर प्रवेशिताचा मृत्यू संस्थेच्या आवारात किंवा संस्थेत दाखल असताना झालेला नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सदर प्रवेशित बालगृहातील इतर प्रवेशितांनी मारहाण केलेली आहे. याबाबत इतर प्रवेशितांवर भा.द.वि.३०२ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. बालगृहातील अधिक्षक यांनी छळ व अनैतिक कृत्य केलेले नाही.

(३) होय.

याबाबत तेव्हा कर्तव्यावर हजर असलेले श्री.बी.बी. रावळ (गृहपाल) श्री.आप्पासाहेब वरकड (रक्षक) यांना सेवेतून निलंबित केलेले आहे. तसेच श्री.तुषार भिलावेकर (अधिक्षक) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने सुमोटो पीआयएल दाखल करुन घेतली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाघेरेपाडा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील आदिवासी समाजाच्या स्मशानभुमीच्या जागेवर बेकायदेशीरपणे गोदाम बांधल्याबाबत**

**(४३) * १९३५८ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघेरेपाडा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील आदिवासी समाजाच्या स्मशानभुमीच्या जागेवर अतिक्रमण करुन गोदाम बांधल्याने आदिवासी बांधवांनी तक्रार करुनही सदर गोदाम मालकावर आजतागायत कोणतीही कारवाई झाली नसल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार बेकायदेशीरपणे बांधण्यात आलेले गोदाम निष्कासित करुन गोदाम बांधणा-या विकासकावर व प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नच उद्भवत नाही.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## किनवट (जि. नांदेड) तालुक्यात लघुपाटबंधारे (जलसंधारण) उपविभाग प्रशासनाच्या गैरकारभारामुळे शासनाचा निधी परत गेल्याबाबत

**(४४) * १७१३४ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट तालुक्यात लघुपाटबंधारे (जलसंधारण) (जि.नांदेड) उपविभाग प्रशासनाच्या गैरकारभारामुळे मार्च अखेरपर्यंत द्वारयुक्त सिमेंट बंधारे व कोल्हापूर बंधारे उभारणी न केल्यामुळे १ कोटी ४० लाख रुपये निधी शासनाकडे परत गेला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील यलकवाडी व बुधवार पेठ या आदिवासी गावात कोल्हापूर बंधारा उभारणीसाठी आलेला ४० लाख रुपयांचा निधी बिगर आदिवासी गावाच्या कामावर वर्ग करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने शासनाकडे निधी परत जाण्याची कारणे काय आहेत, तसेच आदिवासी उपयोजनेतून बिगर आदिवासी गावात विकास कामे करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

आदिवासी उपयोजना (TSP+OTSP) कामासाठी प्राप्त झालेल्या रु.१३८.९६ लक्ष निधीपैकी रु. ८८.४१ लक्ष निधी खर्च झाला आहे.

(२) जनजाती क्षेत्र अंतर्गत कोल्हापूरी पध्दतीने बंधारे (० ते १०० हे.) याकरिता सन २०१४-१५ मध्ये को.प.बं. मलकवाडी, बुधवार पेठ (TSP) या प्रकल्पासाठी तरतूद उपलब्ध नव्हती मात्र को.प.बं चिंचखेड व शिंगारवाडी (OTSP) या प्रकल्पांसाठी तरतूद करण्यात आली होती. सबब बिगर आदिवासी गावात खर्च झालेला नाही.

(३) प्रशासकीय मान्यता व निविदा निश्चिती कार्यवाही वेळेवर पूर्ण होवू न शकल्यामुळे संपुर्ण खर्च होवू शकला नाही. मात्र झालेला खर्च आदिवासी उपाययोजना (TSP+OTSP) अंतर्गत असलेल्या प्रकल्पांच्या कामावर झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नवरगाव (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायतीचे उपसरपंच, ग्राम रोजगार सेवक व ग्रामसेवक यांनी केलेला गैरव्यवहार**

**(४५) * १६६६७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील नवरगाव ग्रामपंचायतीने सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६ या वर्षामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अतंर्गत लाखो रुपयांचे पादन रस्ते, तलावातील गाळ काढणे, वृक्ष लागवड, शोष खडे, रोपवाटीका इत्यादी कामे करण्यात आली, या कामावर देखरेख करण्यासाठी ग्रामपंचायतीचे उपसंरपच यांनी आपल्या पदाचा दुरूउपयोग करुन शशिकांत सुरेश गिरडकर या आपल्या मुलाची महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेवर ग्राम रोजगार सेवक पदी नियमबाहय नेमणूक केली असल्याची माहिती माहे दिनांक २४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६ या वर्षामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामावर उपसरंपच, ग्राम रोजगार सेवक व ग्रामसेवक या तिघानी संगनमत करुन ग्राम रोजगार सेवक यांचे भाऊ, बहिण, आई, पत्नी आणि नातेवाईक तसेच बनावट मजुर काम केल्याचे हजेरीपटावर दाखवून जवळपास ७ लाख १७ हजार ०१७ रुपये बळकावून शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करुन संबधितावर फौजदारी कार्यवाही करावी असे मागणी करणारे निवेदन संपूर्ण कागदपत्रासह लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी चंद्रपूर, मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना दिनांक २६ मे, २०१५ रोजी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

श्री.शशिकांत सुरेश गिरडकर यांची ग्राम रोजगार सेवक या पदावर नियमबाह्य नेमणुक केलेली नाही.

(२) होय.

सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ आणि २०१५-१६ या वर्षामध्ये हजेरीपटावर नातेवाईक आणि बनावट मजूर दाखवुन एकूण रुपये २,०४,९३५ एवढ्या रकमेचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) होय.

(४) याप्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशीत जॉब कार्डवर नातेवाईक व मजूरांची खोटी नावे टाकून मजुरीच्या रकमेचा अपहार केल्याचे आढळून आले आहे. याबाबत ग्राम रोजगार सेवक यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असुन ग्राम विकास अधिकारी, स्थापत्य अभियंता यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.